# MAHARASHTRA STATE COUNCIL OF EXAMINATION, PUNE

Government Commercial Certificate Examination

**6 JULY, 2018**

[Time : 14-00]

(Total Marks for Sections I and II : 100)

**MARATHI TYPEWRITING**

(40 Words Per Minute)

**SECTION - II**

(Time Allowed : 7 Minutes)

**मराठी टंकलेखन**

(४० शब्द प्रति मिनिट)

**विभाग - २**

(वेळ : ७ मिनिटे)

**सूचना :** गती उतारा एकदा टंकलिखित झाल्यावर पुन्हा तोच उतारा टंकलिखित करु नये. खालील मजकूर डाव्या बाजूस १५ पदे समास सोडून द्विपंक्ती (डबल लाइन स्पेसिंग) अंतराने टंकलिखित करा :

---

**[गुण : ४०]**

कोंकणातले लोक देवभोळे, श्रद्धावान, खऱ्या खोट्याचा निर्णय लावणारे. देवापुढे शपथ घेऊन कोणी खोटे बोलू शकणार नाही असा विश्वास बाळगणारे व त्या विश्वासास जागणारे.

एकदा कोंकणातल्या एक शेतकऱ्याची अवजारे गेली. शेतकऱ्याला वाटत होतं ती चोरली शेतकामावर येणाऱ्या मजुरांनीच. पण चोरी केल्याचं कोणीच कबूल करीत नव्हतं. शेवटी देवळात देवासमोर शपथेवर तसं प्रत्येकानं सांगावं असं गावकऱ्यांनी ठरविलं. शेजारच्या गावात जागृत देवस्थान होतं. तिथे जाऊन शपथ घेण्याचा निर्णय सगळ्यांना मान्य झाला.

प्रमुख गावकऱ्यांसह शेतकरी शेतकामगारांना घेऊन शेजारच्या गावात पोचला. त्यांना दवंडी पिटलेली ऐकू येऊ लागली. जवळ गेल्यावर सगळे स्पष्ट ऐकू आले.

ऐका हो ऐका, आपल्या गावातल्या देवळातील सुप्रसिद्ध घंटा चोरीला गेली आहे. जो कुणी चोर पकडून देईल, चोरी कुणी केली सांगेल त्याला मोठं बक्षीस दिलं जाईल.

दवंडी ऐकून शहाणा शेतकरी बरोबरच्या लोकांना म्हणाला, आपण इथूनच परंतु देवासमोरची घंटा चोरीला गेली. तिचा शोध लागत नाही. चोर सापडत नाही मग माझी अवजारं चोरणाऱ्या चोराचा पत्ता कसा लागणार.

थोडक्यात देवावर कितीही श्रद्धा असली तरी आपले प्रश्न सोडविण्यात अंधश्रद्धा उपयोगी पडत नाहीच. काही कठीण समस्या काहीकाळानेच सुटू शकतात. संकटकाळी स्वतःचाच विचार न करता संकटावर मात करण्यासाठी प्रयत्न करणेच माणुसकीच्या नात्याने योग्य ठरते. एखाद्याने दिलेला उपदेश योग्य असेल तर तो वेळीच अंमलात आणला पाहिजे.